नि.दि.दा.क्र.२१७/२०१५
सुरेखा/सुगंधा व इतर
निशाणी – ६७ खाली

**शपथेवर उर्वरित उलटतपास वादीतर्फे श्री. सी. ई. बर्गे वकील यांच्यामार्फत**

२०. माझे लग्न १९६२ साली झाले. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतींच्या ७/१२ च्या उता–यांवर माझ्या नावाची नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीदार गायकवाड यांच्या नावाची झालेली नोंद विरुध्दात अपिल झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, पुर्वीचा दावा क्र.३८/२००३ मध्ये माझी वादी म्हणून नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतचे वादी हे प्रतिवादी होते.

२१. मला लिहीता, वाचता येत नाही. मला सही करता येते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या नावाची नोंद ७/१२ च्या उता–यावर व्हावी याकरिता मी कधीही प्रयत्न केला नव्हता. मी हणमंतची मुलगी आहे हे दर्शविण्याकरिता माझ्याकडे कुठलाही सरकारी कागद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वाटून मागितले होते परंतु, माझा दावा रद्द झाला होता.

२२. हे म्हणणे खरे आहे की, हणमंतची पहिली पत्नी सुगंधा ही सन १९६६ मध्ये मरण पावली. हे मला माहिती नाही की, त्यानंतर माझ्या वडीलांनी दुसरे लग्न केले किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, हणमंतच्या मृत्युनंतर त्यांची दुसरी पत्नी सुगंधा व भाऊ उत्तम यांच्या नावाची नोंद ७/१२ ला झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या दोघांच्या नावांची नोंद प्रत्येकी ८ आणे ने आजही कायम आहे. मी सुगंधा व उत्तम यांच्या नावांच्या झालेल्या नोंदीबाबत तक्रार केली होती. त्या तक्रारीबाबत कागदपत्र मी अभिलेखावर दाखल केले नाहीत.

२३. मी दरवर्षी चावडी भरते. परंतु, त्याबाबतच्या पावत्या मी अभिलेखावर दाखल केलेल्या नाहीत. वादींनी केलेले खरेदीपत्र बनावट आहे याकरिता मी कुठलाही दावा केला नव्हता.

२४. हे मला माहीत नाही की, हणमंतला सुगंधा नावाचीच दुसरी पत्नी होती किंवा

कसे. माझी आई सुगंधा वारली तेव्हा मी दिड वर्षांची होती. हे मला माहीती नाही की, माझे वडील वारले त्यानंतर त्यांची दुसरी पत्नी सुगंधा हीच्या नावाची नोंद झाली किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, मी विनाकारणच वादींच्या दाव्याला विरोध करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादींचे दस्त मी कुठल्याही न्यायालयामधून रद्द करून घेतलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, माझा वाद माझ्या हिश्या पुरता आहे.

उलटतपास पुर्ण<br>
फेरतपास नाही

श्रवणोत्तर स्विकृत<br>
माझ्या समक्ष

ठिकाण – फलटण<br>
दिनांक २६/०२/२०२४

(आर. डी. भुयारकर)<br>
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, फलटण

नि.दि.दा.क्र.२१७/२०१५

सुरेखा/सुगंधा व इतर
निशाणी – ६७ खाली

**शपथेवर उलटतपास वादीतर्फे श्री. सी. ई. बर्गे वकील यांच्यामार्फत**

१८. मी हल्ली गुळूंब या गावी रहायला आहे. हे म्हणणे खरे आहे की, ते गाव फलटण पासून लांब आहे. हे म्हणणे खरे आहे की, गायकवाड यांच्या खरेदीपत्राची नोंद झाली त्याबाबत मी आर.टी.एस. अपिल ॲड. बी. के. शिंदे यांच्यामार्फत केले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या अपिलाचा निकाल झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या निकालानंतर मी ॲड. बी. के. शिंदे यांच्यामार्फतच वाटपाचा दावा दाखल केला होता. हे मला माहिती नाही की, गायकवाड यांचे खरेदीपत्र माझ्या हिश्यावर बंधनकारक नाही अशी मी त्या दाव्यामध्ये मागणी केली होती किंवा कसे. हे मला आठवत नाही की, माझी आर्थिक परिस्थीती चांगली नाही म्हणून मला सुट मिळण्याकरिता मी त्या दाव्यामध्ये अर्ज दाखल केला होता किंवा कसे.

१९. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतींच्या ७/१२ च्या उता–यांवर माझ्या नावाची नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की, सुगंधा ही माझी सावत्र आई आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सख्या आईचे नाव सुध्दा सुगंधाच होते. हे मला माहित नाही की, माझ्या सावत्र आईचे पाहिले नाव सुमन होते व त्यानंतर तिचे नाव सुगंधा करण्यात आले किंवा कसे.

**विद्युतप्रवाह खंडीत झाल्याने साक्षीदाराचा उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.**

श्रवणोत्तर स्विकृत
माझ्या समक्ष

ठिकाण – फलटण
दिनांक ०९/०१/२०२४

(आर. डी. भुयारकर)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, फलटण